Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर २०२६ । वर्ष १ । अंक १७६ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION



दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या!
(पान २ वर)

Selected

इंडिगोकडून प्रवाशांना मोठा झटका, तिकिटांचे दर एक ते दहा हजारांनी वाढणार

मुंबई: आज मध्यरात्रीपासून नवे दर लागू होणार नवी दिल्ली: विमान प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी आहे. इंडिगोने देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानांच्या तिकिटांवरील इंधन शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. विमान इंधनांच्या वाढत्या किमतीचा परिणाम म्हणून या निर्णयाकडे पाहिले जात आहे. इंडिगोने दिलेल्या माहितीनुसार, ६ ऑक्टोबर २०२६ रोजी मध्यरात्रीनंतर होणाऱ्या नवीन बुकिंगसाठी सुधारित इंधन शुल्क लागू होईल. त्यानंतर विमानाचे तिकीट बुक करणाऱ्या प्रवाशांना पूर्वीच्या तुलनेत अधिक पैसे मोजावे लागू शकतात. एटीएफच्या किमतीत वाढ गेल्या काही दिवसात विमान इंधनाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. मध्य पूर्वेतील वाढत्या भू-राजकीय तणावाचा परिणाम कच्च्या तेलाच्या किमतीवर झाला आहे.

दुष्काळावर केंद्राच्या पूर्ण मदतीचे आश्वासन; मंत्रिमंडळ फेरबदलाबाबत एकनाथ शिंदेंचे सूचक वक्तव्य

मोदी-शिंदे भेटीनंतर श्रीकांत शिंदेंच्या मंत्रिमंडळ प्रवेशाची चर्चा!

मोदी-शिंदे भेटीने राजकीय चर्चेला वेग | दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना केंद्राची साथ

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली । महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली. या भेटीत राज्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना तसेच केंद्राच्या मदतीबाबत सविस्तर चर्चा झाली.

याच भेटीनंतर प्रस्तावित केंद्रीय मंत्रिमंडळ फेरबदलाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांना केंद्रात मंत्रिपदाची संधी मिळणार का? या चर्चेलाही राजकीय वर्तुळात वेग आला आहे. एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान मोदी यांना महात्मा फुले यांची प्रतिमा भेट दिली. भेटीनंतर बोलताना त्यांनी सांगितले की, राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत पंतप्रधानांनी सकारात्मक भूमिका घेतली असून "अन्नदाता शेतकऱ्यावरील सध्याच्या भीषण संकटात महाराष्ट्राला केंद्राची यावेळेसही पूर्ण साथ मिळेल," असा विश्वास व्यक्त केला. शेतकऱ्यांची दिवाळी उदास जाऊ नये, यासाठी काटेकोर उपाययोजना करण्याच्या सूचना मोदी यांनी दिल्याचे शिंदे यांनी सांगितले. दुष्काळाच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्राचे पथक येत्या दोन-तीन दिवसांत महाराष्ट्रात दाखल होणार असल्याची माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली. राज्यातील शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळावी, यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या



समन्वयातून उपाययोजना केल्या जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. घटनात्मक पदावर २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने शिवसेनेतर्फे राज्यभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पत्नींना मदत करण्यासह विविध उपक्रमांचा त्यात समावेश असेल. मोदी-शिंदे भेटीनंतर सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो केंद्रीय मंत्रिमंडळाच्या संभाव्य विस्ताराचा. केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार किंवा फेरबदल याबाबत एनडीएचे प्रमुख म्हणून पंतप्रधान योग्य वेळी निर्णय घेतील, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मात्र, त्यांच्या या सूचक वक्तव्यामुळे श्रीकांत शिंदे यांच्या संभाव्य मंत्रिपदाबाबतच्या चर्चेला उधाण आले आहे. अलीकडेच शिवसेना (उबाठा) पक्षाचे सहा खासदार शिवसेना (शिंदे) गटात गेल्याने लोकसभेतील शिंदे गटाची खासदारसंख्या वाढून १३ झाली आहे. या पार्श्वभूमीवर आगामी केंद्रीय मंत्रिमंडळ फेरबदलात श्रीकांत शिंदे यांना संधी मिळू शकते, अशी राजकीय चर्चा सुरू आहे. मात्र, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. विधान परिषद निवडणुकीत महायुती एकत्र निर्णय घेणार विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने पुणे मतदारसंघात स्वतंत्र उमेदवार उभा केला असला, तरी अर्ज भरणे आणि माघारीच्या प्रक्रियेदरम्यान महायुतीतील चर्चेनंतर अंतिम निर्णय घेतला जाईल, असे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. महायुती या निवडणुकीत एकमताने निर्णय घेईल, असेही त्यांनी सांगितले. एसआयआरवरून काँग्रेसला सवाल विरोधकांच्या आंदोलनावर टीका करताना शिंदे यांनी एसआयआर आणि ईव्हीएमच्या मुद्द्यावरून काँग्रेस नेतृत्वावरही निशाणा साधला. विधानसभा निवडणुकीतील मतांची संख्या वाढल्याबाबत प्रश्न उपस्थित करून विरोधकांनी मोर्चा काढला होता. मात्र, एसआयआर सुरू झाल्यानंतर अपात्र मतदारांची नावे वगळण्याच्या प्रक्रियेला विरोध केला जात असल्याचे सांगत त्यांनी विरोधकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

ठाकरे बंधूंवरही टीकास्त्र

ठाकरे यांच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरील टीकेवरही शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली. मोदी हे देशाचे पंतप्रधान असून त्यांच्याबद्दलची टीका एका मर्यादेपर्यंत असावी, असे सांगत त्यांनी ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. न्यायालये आणि घटनात्मक संस्थांबाबत मार्गदर्शन करणारे ठाकरे स्वतः लोकांमधून निवडून न येता विधान परिषदेतून आले आहेत, अशी टीकाही त्यांनी केली. दरम्यान, दुष्काळ, महायुतीतील जागावाटप आणि संभाव्य केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तार या तीनही मुद्द्यांमुळे एकनाथ शिंदे यांच्या दिल्ली दौऱ्याला राजकीयदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले आहे.

शेतकरी आत्महत्येची जबाबदारी बँकांवर; बावनकुळे यांची स्पष्टोक्ती

जन सम्राट टाईम्स

मुंबई:। प्रतिनिधी: राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना पीक कर्जवसुलीपासून दिलासा देण्यात आला असताना बँका, पतसंस्था किंवा वित्तसंस्थांनी वसुलीसाठी शेतकऱ्यांना फोन करून अथवा तगादा लावून त्रास देऊ नये, असा स्पष्ट इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे. कर्जवसुलीच्या दबावामुळे एखाद्या शेतकऱ्याने आत्महत्या केली तर संबंधित बँक, पतसंस्था तसेच संबंधित प्रशासकीय यंत्रणेला थेट जबाबदार धरले जाईल, असा इशारा त्यांनी एका पत्रकार परिषदेत दिला. बावनकुळे यांनी जळगाव जिल्ह्यातील पंधरा तालुक्यांतील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतल्यावर ही माहिती दिली. दुष्काळी परिस्थितीत पीक कर्जवसुलीला स्थगिती देण्यात आली असून, या काळात कोणत्याही बँक किंवा पतसंस्थेच्या कर्मचाऱ्याने शेतकऱ्यांच्या दारात वसुलीसाठी जाऊ नये. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिकाऱ्यांनीही याबाबत आवश्यक सूचना द्याव्यात, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सरकारकडून युद्धपातळीवर कार्यवाही सुरू असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्राचे पथक, राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी (एनडीआरएफ) तसेच दुष्काळ निवारण समिती आणि मंत्रिमंडळ उपसमितीच्या माध्यमातून मदतीचे नियोजन केले जात आहे. शेतकऱ्यांना यंदा दिवाळीपूर्वीच आर्थिक मदत देण्याचा सरकारचा जोरदार प्रयत्न असल्याचे बावनकुळे यांनी



यावेळी सांगितले. झालेल्या पिकांचे पंचनामे अत्यंत अचूकपणे करण्याचे सक्त निर्देशही बावनकुळे यांनी दिले आहेत.
शेतातील पीक काढून घेतलेले असले तरीही प्रत्यक्ष परिस्थितीची सखोल पडताळणी करूनच पंचनामे पूर्ण करण्याची भूमिका त्यांनी मांडली. केंद्राकडून वेळेवर मदत मिळविण्यासाठी नुकसानीचे योग्य दस्तऐवजीकरण असणे अत्यंत आवश्यक असल्याने, या पंचनाम्याच्या प्रक्रियेत कोणतीही तांत्रिक अडचण निर्माण होऊ देऊ नये, असे त्यांनी आवर्जून स्पष्ट केले. दुसरीकडे, शेतकऱ्यांना नवीन कर्ज देण्याबाबत वारंवार सूचना देऊनही सकारात्मक प्रतिसाद न देणाऱ्या व्यावसायिक बँकांसंदर्भातही बावनकुळे यांनी अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. शासनाची विविध खाती ज्या बँकांमध्ये जमा आहेत, त्या बँकांनी अडचणीच्या काळात शेतकऱ्यांना कर्ज देण्यास पूर्ण सहकार्य करणे अपेक्षित आहे. मात्र, शासनाचे आदेश देऊनही वेळेवर कर्जवाटप न करणाऱ्या अशा बँकांमधील सर्व सरकारी खाती तत्काळ काढून इतरत्र वळवण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पंधरा दिवसांच्या आत पात्र शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे सक्त निर्देशही बावनकुळे यांनी दिले.
असल्याचे समजते. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना पीक कर्जवसुलीपासून दिलासा देण्यात आला असताना बँका, पतसंस्था किंवा वित्तसंस्थांनी वसुलीसाठी शेतकऱ्यांना फोन करून अथवा तगादा लावून त्रास देऊ नये, असा स्पष्ट इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे. कर्जवसुलीच्या दबावामुळे एखाद्या शेतकऱ्याने आत्महत्या केली तर संबंधित बँक, पतसंस्था तसेच संबंधित प्रशासकीय यंत्रणेला थेट जबाबदार धरले जाईल, असा इशारा त्यांनी एका पत्रकार परिषदेत दिला. बावनकुळे यांनी जळगाव जिल्ह्यातील पंधरा तालुक्यांतील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतल्यावर ही माहिती दिली.

तुकाराम मुंढेंच्या FDA ला सुप्रीम कोर्टाचा मोठा दिलासा

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी: अन्न आणि औषध प्रशासनाला (FDA) सर्वोच्च न्यायालयाकडून (Supreme Court) मोठा दिलासा मिळाला आहे. पुण्यातील गुरुनानक डेअरी अँड स्वीट्सचा फूड लायसन्स निलंबित केल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने (Mumbai High Court) FDA ला दुकान मालकाला 5 लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले होते. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा हा नुकसानभरपाईचा आदेश रद्द केला आहे. त्यामुळे तुकाराम मुंढे (Tukaram Mundhe) यांच्या नेतृत्वाखालील FDA ला मोठा दिलासा मिळाला आहे.राज्यात सध्या भेसळखोरांविरोधात अन्न आणि औषध प्रशासनाकडून कारवाईचा धडाका सुरू आहे. FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कडक भूमिकेमुळे हॉटेल्स, दूध डेअऱ्या आणि खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये कारवाईची धास्ती निर्माण झाली आहे. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने खाद्यपदार्थांच्या गुणवत्ता आणि स्वच्छतेबाबत FDA कडून तपासण्या केल्या जात आहेत.याच कारवाईदरम्यान पुण्यातील गुरुनानक डेअरी अँड स्वीट्सविरोधात FDA ने कारवाई केली होती. खाद्यपदार्थांमुळे फूड पॉइझनिंग झाल्याची तक्रार तसेच स्वच्छतेसंदर्भातील तक्रारी प्राप्त झाल्यानंतर FDA ने 12 जून



रोजी डेअरीचे फूड लायसन्स निलंबित केले होते. त्यामुळे संबंधित दुकानाचा व्यवसाय बंद ठेवावा लागला. यानंतर FDA च्या अधिकाऱ्यांनी गुरुनानक डेअरीची पुन्हा तपासणी केली. या तपासणीदरम्यान संबंधित आस्थापनेकडून नियमांचे तब्बल 98 टक्के पालन होत असल्याचे आढळून आल्याचा दावा करण्यात आला. मात्र, त्यानंतरही दुकानाचा परवाना तातडीने बहाल करण्यात आला नाही. त्यामुळे डेअरीच्या मालकाने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली.परवाना निलंबित राहिल्यामुळे गुरुनानक डेअरी अँड स्वीट्स हे दुकान तब्बल 34 दिवस बंद राहिले. दुकान बंद राहिल्याने व्यवसायाचे मोठे नुकसान झाल्याचा दावा दुकान मालकाकडून करण्यात आला. या 34 दिवसांच्या कालावधीत सुमारे 8 लाख 74 हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे दुकान मालकाने न्यायालयात सांगितले होते. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने FDA च्या कारवाईबाबत नाराजी व्यक्त केली होती. पुन्हा केलेल्या तपासणीत नियमांचे मोठ्या प्रमाणात पालन होत असल्याचे समोर आल्यानंतरही परवाना निलंबित ठेवणे योग्य नसल्याचे न्यायालयाने म्हटले होते. त्यानंतर FDA चा परवाना निलंबित करण्याचा आदेश रद्द करत दुकान पुन्हा सुरू करण्याची परवानगी देण्यात आली होती. तसेच दुकान बंद राहिल्यामुळे झालेल्या नुकसानीपोटी गुरुनानक डेअरीच्या मालकाला 5 लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने FDA ला दिले होते. याच निर्णयाला अन्न आणि औषध प्रशासनाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले.

मोदींची भेट घेताच शिंदेंची मोठी घोषणा

मुंबई : हाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिल्लीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे तासभर चर्चा झाली. या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना शिंदे यांनी बैठकीतील चर्चेबाबत माहिती दिली. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीबाबत मोदींशी चर्चा केल्याचं शिंदे यांनी सांगितलं. राज्यातील पाणी, चारा आणि नुकसान झालेल्या भागांची परिस्थिती याबाबत पंतप्रधानांनी माहिती घेतल्याचं त्यांनी सांगितलं."शेतकऱ्यांची दिवाळी काळी होणार नाही. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे," असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं.

पुन्हा हवामान फिरले!

'या' जिल्ह्यांना पावसाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

नाशिक| प्रतिनिधी: पावसाने राज्यातील बहुतांश भागातून माघार घेतल्यानंतर राज्यात उन्हाचे चटके वाढण्यास सुरवात झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील उकाड्यात वाढ झाली आहे. कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक नोंदवण्यात आले आहे. तर पुढील काही दिवसात राज्याच्या उत्तरेच्या भागात कमाल तापमानात 2 ते 3 अंश सेल्सिअसने वाढ होईल. यामुळे ऑक्टोबरच्या पहिल्याच आठवड्यात नागरिकांना उन्हाचा तडाखा सहन करावा लागत आहे. राज्यात शनिवारपासून मोसमी पावसाचा परतीचा प्रवास सुरू झाला असून पुढील दोन ते तीन दिवसांत संपूर्ण राज्यातून मोसमी पाऊस परतणार आहे. राज्याच्या अंतर्गत भागात 8 ते 11 ऑक्टोबर या कालावधीत कमाल तापमान ३७ ते 39 अंशांच्या दरम्यान राहील अशीही शक्यता आहे.परतीच्या पावसाला सुरुवात झाल्यानंतर पश्चिम महाराष्ट्र आणि पूर्व विदर्भात पावसाला पोषक हवामान निर्माण झाले आहे. आज दक्षिण कोकणात उष्ण व दमट हवामानाची शक्यता आहे.
तसंच, कोल्हापुरचा घाटमाथा, सातारा घाटमाथा आणि गडचिरोली जिल्ह्यात विजांसह पावसाची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशारा यलो अलर्ट देण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या निम्म्या भागातून मान्सून परतला असून दोन ते तीन दिवसांत मराठवाडा, विदर्भाच्या बहुतांश भागासह राज्यातील आणखी काही भागातून मान्सून परतण्याची शक्यता आहे.. पश्चिम बंगालपासून विदर्भ, मराठवाड्यापर्यंत समुद्र सपाटीपासून 3.1 किमी उंचीवर हवेचा कमी दाबाचा पट्टा आहे.



उत्तर कर्नाटक परिसरावर 900 मीटर उंचीवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उष्ण व दमट हवामानाची शक्यता आहे. तसंच, मध्य महाराष्ट्रातील सातारा घाटमाथा, कोल्हापूर घाटमाथा आणि विदर्भातील गडचिरोलीत विजांसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असल्याने यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर, उर्वरित राज्यात उकाडा वाढण्याची शक्यता आहे.पावसाने राज्यातील बहुतांश भागातून माघार घेतल्यानंतर राज्यात उन्हाचे चटके वाढण्यास सुरवात झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील उकाड्यात वाढ झाली आहे. कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक नोंदवण्यात आले आहे. तर पुढील काही दिवसात राज्याच्या उत्तरेच्या भागात कमाल तापमानात 2 ते 3 अंश सेल्सिअसने वाढ होईल. यामुळे ऑक्टोबरच्या पहिल्याच आठवड्यात नागरिकांना उन्हाचा तडाखा सहन करावा लागत आहे. राज्यात शनिवारपासून मोसमी पावसाचा परतीचा प्रवास सुरू झाला असून पुढील दोन ते तीन दिवसांत संपूर्ण राज्यातून मोसमी पाऊस परतणार आहे. राज्याच्या अंतर्गत भागात 8 ते 11 ऑक्टोबर या कालावधीत कमाल तापमान ३७ ते 39 अंशांच्या दरम्यान राहील अशीही शक्यता आहे.परतीच्या पावसाला सुरुवात झाल्यानंतर पश्चिम महाराष्ट्र आणि पूर्व विदर्भात पावसाला पोषक हवामान निर्माण झाले आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

'एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री झाले पाहिजेत!'

गुलाबराव पाटलांच्या वक्तव्याने चर्चेला उधाण; शिंदे मुख्यमंत्री झाले तरच सुखाचे दिवस येतील

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: महायुतीमध्ये भाजपकडे संख्याबळ अधिक असले तरी मित्रपक्षांच्या नेत्यांकडून मुख्यमंत्रिपदाबाबतच्या अपेक्षा वेळोवेळी व्यक्त होताना दिसत आहेत. याच पार्श्वभूमीवर नंदुरबार येथील शिवसेनेच्या मेळाव्यात मंत्री गुलाबराव पाटील यांनी एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्याची भूमिका मांडल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. पाटील यांच्या या वक्तव्याची सप्टेंबर २०२६ मध्येही वृत्तांत नोंद झाली होती. 'आमचे नेते एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री झाले पाहिजेत' नंदुरबारमधील शिवसेनेच्या मेळाव्यात बोलताना गुलाबराव पाटील यांनी आपल्या खास शैलीत कार्यकर्त्यांना संबोधित केले. "प्रत्येक कार्यकर्त्याला आपला नेता मोठा वाटला पाहिजे, यात काही गैर नाही," असे सांगत त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाबाबतची आपली भूमिका स्पष्ट केली. "आमचे नेते एकनाथ शिंदे हेच पुन्हा मुख्यमंत्री झाले पाहिजेत," असे पाटील यांनी ठामपणे सांगितले. त्याचबरोबर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यावरच खऱ्या अर्थाने सुखाचे दिवस येतील, असेही त्यांनी नमूद केले. पाटील यांच्या या वक्तव्यामुळे शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असले, तरी महायुतीच्या सत्तासमीकरणाच्या पार्श्वभूमीवर या वक्तव्याची राजकीय चर्चा सुरू झाली आहे. विरोधकांवरही पाटलांचा जोरदार प्रहार



यावेळी गुलाबराव पाटील यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि इतर विरोधकांवरही जोरदार टीका केली. एकनाथ शिंदे यांना राजकीयदृष्ट्या संपविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. पक्षाची बदनामी करणे तसेच पक्षाचे चिन्ह गोठविण्यासारख्या घटनांमागे काही जण असल्याचा दावा करत, "सगळे सुपाऱ्या घेऊन करत आहेत," अशा शब्दांत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. मात्र, या संपूर्ण प्रकरणात न्यायालयावर आपला पूर्ण विश्वास असून योग्य निर्णय लवकरच मिळेल, असा विश्वासही पाटील यांनी व्यक्त केला. महायुतीच्या सत्तासमीकरणावर पुन्हा चर्चा गुलाबराव पाटील यांच्या वक्तव्यामुळे महायुतीतील मुख्यमंत्रिपदाच्या चर्चेला पुन्हा एकदा राजकीय रंग मिळाला आहे. भाजप हा संख्याबळाच्या दृष्टीने महायुतीतील प्रमुख पक्ष असताना शिवसेनेकडून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाची मागणी पुढे करण्यात आली आहे. दरम्यान, महाराष्ट्राच्या अधिकृत मुख्यमंत्रिपदाच्या माहितीनुसार सध्या देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असून एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री आहेत. त्यामुळे पाटील यांचे वक्तव्य हे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये आपल्या नेत्याच्या नेतृत्वाची अपेक्षा व्यक्त करणारे राजकीय विधान म्हणून पाहिले जात आहे. या वक्तव्यावर महायुतीतील अन्य घटकांकडून काय प्रतिक्रिया उमटते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह; महायुतीत चर्चेला उधाण नंदुरबारच्या मेळाव्यातून गुलाबराव पाटील यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर पुन्हा विश्वास व्यक्त केला. त्यामुळे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, दुसरीकडे आगामी राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर या वक्तव्याचे विविध अर्थ काढले जात आहेत. पाटील यांच्या या विधानामुळे "महायुतीत मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण?" या प्रश्नाची चर्चा पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहेतरी मित्रपक्षांच्या नेत्यांकडून मुख्यमंत्रिपदाबाबतच्या अपेक्षा वेळोवेळी व्यक्त होताना दिसत आहेत. याच पार्श्वभूमीवर नंदुरबार येथील शिवसेनेच्या मेळाव्यात मंत्री गुलाबराव पाटील यांनी एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्याची भूमिका मांडल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या !

अल निनो'चा महाभयानक परिणाम, महाराष्ट्रावर मोठं संकट : गिरीश महाजन

जन सम्राट टाईम्स

एरंडोल-पारोळा । प्रतिनिधी : एरंडोल विधानसभा मतदारसंघातील पातरखेडे येथे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी दुष्काळग्रस्त भागातील पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. पावसातील मोठ्या खंडामुळे पिकांची झालेली दुरवस्था आणि त्यातून शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेले आर्थिक संकट याबाबत यावेळी प्रशासनासमोर वस्तुस्थिती मांडण्यात आली. एरंडोल विधानसभा मतदारसंघातील पारोळा, एरंडोल आणि भडगाव हे तीनही तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर दुष्काळ घोषणेची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकरी आणि नागरिकांना शासनाच्या विविध सवलती, मदत व योजनांचा लाभ तातडीने मिळावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करा पावसातील मोठ्या खंडामुळे खरीप पिकांवर परिणाम झाला असून, शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. पिकांच्या नुकसानीचे पंचनामे, शासकीय मदत आणि दुष्काळी उपाययोजनांच्या अंमलबजावणीत कोणताही विलंब होऊ नये, यासाठी संबंधित प्रशासनाला आवश्यक त्या सूचना देण्याची विनंती करण्यात आली. दुष्काळाच्या परिस्थितीत मतदारसंघातील शेतकरी व नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासनाकडून आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवण्यात येईल, अशी भूमिका यावेळी व्यक्त करण्यात आली. अधिकारी व लोकप्रतिनिधींची उपस्थिती यावेळी जळगाव लोकसभा मतदारसंघाच्या खासदार स्मिता



वाघ, जिल्हाधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर, आमदार मंगेशदादा चव्हाण, आमदार नंदकिशोर महाजन, शिवसेना जिल्हाप्रमुख वासुदेव पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख, शिवसेना गटनेते तथा नगरसेवक प्रा. पै. मनोजभाऊ पाटील, पारोळा नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील, उपजिल्हाप्रमुख मनिषभाऊ पाटील, एरंडोल येथील जावेद मुजावर, अंतुर्लीचे सरपंच गौरव पाटील यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी व शेतकरी बांधव उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या पिठलं-भाकरीचा आस्वाद दरम्यान, स्थानिक शेतकरी बांधवांनी आयोजित केलेल्या पिठलं-भाकरीच्या भोजनाचा मान्यवरांनी आस्वाद घेतला. शेतकरी बांधवांनी केलेल्या या आत्मीय आदरातिथ्यामुळे कार्यक्रमाला आपुलकीचे वातावरण लाभले.अल निनो दिवसेंदिवस अधिकाअधिका सक्रिय होत आहे. याचा परिणाम जागतिक हवामानावर होत आहे. सर्वात मोठा फटका भारतीय मान्सूनला बसला आहे. भारतात पर्जमान्य घटले आहे. यामुळे तीव्र जलसंकट घोंघावत आहे. 'अल निनो'चा महाभयानक परिणाम महाराष्ट्रावर झाला आहे. महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर झाला आहे. महाराष्ट्रात भीषण पाणी टंचाई निर्माण होण्याची भिती आहे. या परिस्थितीचा सामना करण्यासाठी सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. जलसंपदा विभागाचे मंत्री गिरीश महाजन यांनी जल नियोजनाचे निर्देश दिले आहेत. अल निनोच्या प्रभावामुळे महाराष्ट्रात पर्जन्यमान घटलं आहे. अल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून पाण्याच्या नियोजनाचा प्लॅन तयार केला जात आहे. 31 ऑगस्ट 2027 पर्यंत जलसाठ्याचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश मंत्री गिरीश महाजन यांनी दिले आहेत. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार आहे. धरणे आणि जलाशयातील पाण्याचा पहिला हक्क पिण्यासाठी असणार आहे. जलाशयातील 10 टक्के पाणी बफर स्टॉक म्हणून राखीव ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. 16 ऑक्टोबर 2026 पासून स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणी वापरात 10 टक्के कपातीचे आदेश देण्यात आले आहेत. शहरांमध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करून बांधकाम आणि उद्योगांसाठी वापर बंधनकारक करण्यात आले. उद्योगांना 30 टक्के पाणी पुनर्वापराची सक्ती करण्यात आली आहे. अनधिकृत पाणी उपशावर महसूल, पोलीस आणि जलसंपदा विभागाची संयुक्त कारवाई केली जाणार आहे. शेतीसाठी पिण्याचे आणि जनावरांचे पाणी वगळून उर्वरित साठ्यातून टप्प्याटप्प्याने पाणी सोडले जाणार आहे. अर्ध्या महाराष्ट्रात दुष्काळ असताना मुंबईत दररोज रस्ते धुण्याकरता पाण्याची उधळपट्टी केली जात आहे. मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीत 8 कोटी 25 लाखांच्या टँकर खर्चाचा प्रस्ताव मांडण्यात आला. मात्र, एकीकडे मुंबईतच पाणीकपात लागु असतांना रस्ते धुण्यासाठी पाणी आणणार कुठून हा प्रश्न?

रस्ते धुण्याकरता जेटिंग व्यवस्थेसह पाण्याचे टँकर भाडेतत्त्वावर घेण्यात येणार. मुंबईतील सार्वजनिक रस्त्यांवरील धूळ आणि वायू प्रदूषण नियंत्रणासाठी BMC नं मुंबईतील रस्ते दररोज धुण्याचा निर्णय घेण्यात आला. मुंबईतील 7 परिमंडळांमध्ये 150 दिवसांसाठी टँकर सेवा दिली जाईल. पावसाळ्याचा कालावधी वगळून रस्ते धुण्याचे नियोजन करण्यात येणार. 2 हजार, 5 हजार आणि 10 हजार लिटर क्षमतेचे टँकर वापरणार. सातही परिमंडळांसाठी एकूण कंत्राट खर्च 8 कोटी 25 लाख 33 हजार 48 रुपये इतका आहे. पाण्याच्या वापरावरून सत्ताधारी-विरोधकांचा प्रशासनाला सवाल केले आहेत.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

स्वस्त धान्य दुकानदारांच्या सुरक्षेच्या प्रश्नांवर चर्चा!

जन सम्राट टाईम्स

भुसावळ | प्रतिनिधी : अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघाच्या वतीने भुसावळ तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक सोमवार, ५ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता शासकीय विश्रामगृह, भुसावळ येथे पार पडली. जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीला तालुक्यातील सुमारे ७० ते ८० स्वस्त धान्य दुकानदार उपस्थित होते. बैठकीत स्वस्त धान्य दुकानदारांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी, मार्जिन, धान्याचा दर्जा व वजन, ई-केवायसी, राजकीय दबाव तसेच दुकानदारांच्या सुरक्षेसह विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेनंतर विविध मागण्यांबाबत सर्वानुमते ठराव पारित करण्यात आले. दर महिन्याया १० तारखेपर्यंत धान्य देण्याची मागणी स्वस्त धान्य दुकानदारांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत स्वच्छ व चांगल्या प्रतीचे धान्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी बैठकीत करण्यात आली.

तसेच शासकीय धान्य गोदामातून प्रत्येक गोणीमध्ये ५० किलो ५८० ग्रॅम वजनाचे धान्य पूर्णपणे देण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली. लाभार्थ्यांना वितरित होणारे धान्य स्वच्छ आणि मानवी सेवनासाठी योग्य असावे. अस्वच्छ किंवा खराब धान्याचा पुरवठा करू नये, अशी भूमिका दुकानदारांनी मांडली.

राजकीय दबाव व कथित खोट्या तक्रारींचा मुद्दा ऐरणीवर तालुक्यातील काही स्वस्त धान्य दुकानदारांविरुद्ध राजकीय दबावातून खोट्या तक्रारी करून त्यांना विनाकारण त्रास दिला जात असल्याचा आरोप बैठकीत करण्यात आला. अशा प्रकारचा दबाव टाकण्याच्या प्रकाराचा दुकानदारांनी निषेध व्यक्त केला. तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता तक्रारीची वस्तुनिष्ठ शहानिशा करूनच कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. यासंदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना लवकरच निवेदन देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

ई - के वा य सी बा बत दुकानदारांची भूमिका लाभार्थ्यांना ई-केवायसी करण्याबाबत स्वस्त धान्य दुकानदारांकडून वारंवार सूचना दिल्या जात असतानाही काही लाभार्थी जाणूनबुजून ई-केवायसी करत नसल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

त्यामुळे ई-केवायसी न झाल्याचा दोष थेट स्वस्त धान्य दुकानदारांवर टाकू नये, अशी मागणी करण्यात आली. दुकानदारांच्या सुरक्षेचा प्रश्नही चर्चेत स्वस्त धान्य दुकानदारांना काही ठिकाणी शिवीगाळ तसेच मारहाणीच्या घटनांना सामोरे जावे लागत असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. अशा प्रकारे दुकानदारांशी गैरवर्तन करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. दुकानदारांच्या सुरक्षेसाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात आणि त्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन न्याय द्यावा, अशी अपेक्षा बैठकीत व्यक्त करण्यात आली.

उड्डाणानंतर विमान अचानक गायब अन् थेट नदीजवळ कोसळलं

पायलटसह सर्व प्रवाशांचा मृत्यू

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: एक मोठी विमान दुर्घटना समोर आली असून लष्करी विमान कोसळल्यामुळे ३२ जणांचा मृत्यू झाला आहे. ही घटना नायजेरियामधील नैऋत्येकडील ओंडोमध्ये घडली आहे. राष्ट्राध्यक्ष बोला टिनुबू यांचे कार्यालय आणि नायजेरियन हवाई दलाने या अपघाताची माहिती देताना सांगितलं की, हा अपघात स्थानिक वेळेनुसार सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास झाला. तर हे विमान इग्बोकोडा परिसराजवळ कोसळले. एटीआर-४२ हे विमान बेनिन सिटीहून लागोसकडे एका 'नियमित मोहिमेवर' जात असताना ही दुर्घटना घडली. विमानात एकूण २५ प्रवासी आणि ७ कर्मचारी होते. हवाई वाहतूक मंत्री फेस्टस केयामो यांनी सांगितलंय की, विमान एका नौदल तळाजवळ कोसळले. सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास विमान रडारवरून गायब झाले.त्यानंतर त्याचा ढिगारा नौदल तळाजवळ सापडला. अपघातानंतर



बचाव आणि आपत्कालीन पथकांनी परिसरात शोध सुरू केला. सोशल मीडियावर फिरत असलेल्या एका व्हिडिओमध्ये नदीजवळ लोकांची गर्दी आणि आपत्कालीन पथके बोटीने शोध घेत असल्याचे दिसत होते. एका स्थानिक रहिवाशाने अपघाताच्या वेळी मोठा आवाज ऐकल्याचे सांगितले, जो त्यांना सुरुवातीला मेघगर्जनेचा आवाज वाटला. जवळच्या दलदलीच्या भागात मासेमारी करणाऱ्या एका व्यक्तीने नौदल तळ आणि स्थानिकांना अपघाताची माहिती दिली.

या दुःखद अपघातानंतर, राष्ट्राध्यक्ष बोला टिनुबू यांनी नायजेरियन हवाई दलाला विमान अपघाताचे कारण निश्चित करण्यासाठी तातडीने सखोल चौकशी सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. तथापि, अपघाताचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. लष्करी विमान कोसळल्यामुळे ३२ जणांचा मृत्यू झाला आहे. ही घटना नायजेरियामधील नैऋत्येकडील ओंडोमध्ये घडली आहे. राष्ट्राध्यक्ष बोला टिनुबू यांचे कार्यालय आणि नायजेरियन हवाई दलाने या अपघाताची माहिती देताना सांगितलं की, हा अपघात स्थानिक वेळेनुसार सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास झाला. तर हे विमान इग्बोकोडा परिसराजवळ कोसळले. एटीआर-४२ हे विमान बेनिन सिटीहून लागोसकडे एका 'नियमित मोहिमेवर' जात असताना ही दुर्घटना घडली. विमानात एकूण २५ प्रवासी आणि ७ कर्मचारी होते. हवाई वाहतूक मंत्री फेस्टस केयामो यांनी सांगितलंय की, विमान एका नौदल तळाजवळ कोसळले. सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास विमान रडारवरून गायब झाले.त्यानंतर त्याचा ढिगारा नौदल तळाजवळ सापडला.

विद्यार्थ्यांच्या एसटीसाठी जळगावच्या कॉम्प्युटर असोसिएशनचा पुढाकार!

घोटीजवळील पवनानगरातील विद्यार्थ्यांचे आंदोलन मागे

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: शिक्षणासाठी दररोज तब्बल १० किलोमीटरचा पायी प्रवास करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या एसटी बसच्या मागणीला अखेर सकारात्मक प्रतिसाद मिळाला. नाशिक, घोटीजवळील पवनानगर येथे आपल्या मागणीसाठी रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात जळगाव कॉम्प्युटर्स असोसिएशनच्या सदस्यांनी सहभाग घेत मध्यस्थीची भूमिका बजावली. विद्यार्थ्यांना पाणी वाटप करण्यासोबतच महामंडळाचे अधिकारी आणि शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी JJI-TAच्या सदस्यांनी पुढाकार घेतला. दिनांक १ ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारे १.३० वाजेपर्यंत पवनानगर येथे आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू होते. हे विद्यार्थी दररोज सुमारे ५ किलोमीटर पायी चालत शाळेत जातात. ये-जा धरून त्यांना दररोज जवळपास १० किलोमीटरचा प्रवास करावा लागत



असल्याने शाळेत जाण्यासाठी एसटी बससेवेची मागणी त्यांनी केली होती. वर्षभरापासून मागणी; विद्यार्थ्यांचा रस्त्यावर उतरून एल्गार विद्यार्थ्यांनी एसटी बससेवेबाबत महामंडळ तसेच शिक्षणाधिकारी यांच्याकडे मागील वर्षभरापासून मागणी केली होती. मात्र, त्यांच्या मागणीवर अपेक्षित कार्यवाही होत नसल्याने अखेर विद्यार्थ्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला. उन्हात रस्त्यावर बसून आपल्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांची परिस्थिती पाहून जळगाव कॉम्प्युटर्स असोसिएशनच्या सदस्यांनी आंदोलनात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. विद्यार्थ्यांना पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करून त्यांच्या आंदोलनाला नैतिक पाठिंबा देण्यात आला. अधिकाऱ्यांशी चर्चा; प्रश्न सोडविण्यासाठी मध्यस्थी केवळ आंदोलनात सहभागी होण्यापुरती भूमिका न ठेवता JJI-TAच्या सदस्यांनी महामंडळाचे अधिकारी आणि शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. विद्यार्थ्यांची नेमकी अडचण, त्यांचा दररोजचा पायी प्रवास आणि एसटी सेवेची असलेली गरज अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. या मध्यस्थीनंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर सकारात्मक तोडगा काढण्याच्या दृष्टीने प्रक्रिया सुरू झाली आणि आंदोलन मागे घेण्यात आले.

बसच्या चाकाखाली येऊन विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू

जन सम्राट टाईम्स

पाळधी । प्रतिनिधी: शाळा सुटल्यानंतर बस पकडण्यासाठी झालेल्या गर्दीत तोल जाऊन बसच्या मागील चाकाखाली आल्याने १६ वर्षीय विद्यार्थिनी राजनंदिनी श्रीराम शिंदे हिचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पाळधी येथे घडली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शाळा



सुटल्यानंतर घरी जाण्यासाठी विद्यार्थी बसस्थानक परिसरात मोठ्या संख्येने गर्दी करतात. याच वेळी बस पकडण्याच्या प्रयत्नात राजनंदिनी हिचा गर्दीत तोल गेला आणि ती बसच्या मागील चाकाखाली आली. या दुर्घटनेत तिचा मृत्यू झाला.

राजनंदिनीच्या अकाली निधनामुळे तिच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, तिच्या मृत्यूने परिसरातील नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्येही शोककळा पसरली आहे. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर शाळा सुटण्याच्या वेळेत विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र बससेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी पालक आणि नागरिकांकडून होत आहे. विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि बस पकडण्यासाठी होणारी गर्दी लक्षात घेता शाळा सुटण्याच्या वेळेचे नियोजन, अतिरिक्त बसफेऱ्या तसेच बसथांब्यावर सुरक्षित वाहतूक व्यवस्थेची आवश्यकता असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत संबंधित प्रशासन आणि परिवहन यंत्रणेने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सुजात आंबेडकर वरील आक्षेपार्ह कमेंटप्रकरणी कारवाईची मागणी

जन सम्राट टाईम्स

सोयगाव। प्रतिनिधी: वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते तथा राज्य कार्यकारिणी सदस्य सुजात दादा आंबेडकर यांच्याबद्दल सोशल मीडियावर आक्षेपार्ह व अपमानास्पद भाषेत कमेंट करण्यात आल्याचा आरोप करत संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडी, छत्रपती संभाजीनगर (पूर्व) यांच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत ३ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांच्याकडे निवेदन देण्यात आले. या निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष (पूर्व) रामेश्वर तायडे यांची स्वाक्षरी असून, विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्याही आहेत. सोशल मीडिया कमेंट्सवर आक्षेप निवेदनानुसार, सुजात आंबेडकर यांनी 'जय भीम Gen-Z' या कार्यक्रमादरम्यान एका प्रश्नाला उत्तर देताना शहराच्या नामकरणासंदर्भात आपले मत व्यक्त केले होते. त्यानंतर सोशल मीडियावर या विषयावर चर्चा सुरू झाली. या चर्चेदरम्यान काही फेसबुक अकाउंटवरून सुजात आंबेडकर यांच्याबद्दल अश्लील, अपमानास्पद व आक्षेपार्ह भाषेत कमेंट करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. निवेदनात दोन फेसबुक अकाउंटचा उल्लेख करण्यात आला असून, संबंधित कमेंट्सचे स्क्रीनशॉट पुरावे म्हणून जोडण्यात आल्याचे



वंचित बहुजन आघाडीने म्हटले आहे. वंचितच्या चार प्रमुख मागण्या वंचित बहुजन आघाडीने या प्रकरणात चार प्रमुख मागण्या केल्या आहेत. १. संबंधित दोन्ही फेसबुक अकाउंटची सायबर तांत्रिक पद्धतीने पडताळणी करून अकाउंट चालविणाऱ्या व्यक्तींची ओळख निश्चित करावी. २. संबंधित कमेंट्स, फेसबुक अकाउंटची माहिती, पोस्टच्या लिंक तसेच उपलब्ध डिजिटल पुरावे ताब्यात घेऊन सखोल तपास करावा. कायद्यानुसार गुन्हा दाखल करून सायबर पद्धतीने पुढील कारवाई करावी. ४.सोशल मीडियावरील आक्षेपार्ह वक्तव्यांमुळे सामाजिक तेढ किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित व्यक्तींवर आवश्यक ती प्रतिबंधात्मक कारवाई करावी. राजकीय किंवा सामाजिक विषयांवर मतभेद असले तरी सोशल मीडियावर धार्मिक भावना दुखावणारी, अश्लील किंवा अपमानास्पद भाषा वापरणे टाळले पाहिजे, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोष आढळल्यास कायद्यानुसार तातडीने कारवाई करावी.

देशमुख महाविद्यालयात रंगल्या आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धा

पुरुष गटात चाळीसगाव महाविद्यालयाची बाजी; महिला गटात प्रताप महाविद्यालय अमळनेर विजयी

जन सम्राट टाईम्स

भडगाव । प्रतिनिधी: कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत एरंडोल विभागीय आंतरमहाविद्यालयीन खो-खो (पुरुष व महिला) स्पर्धा भडगाव येथील पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात उत्साहात पार पडल्या. स्पर्धेचे उद्घाटन भडगाव नगरपरिषदेचे नगरसेवक डॉ. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड होते. यावेळी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य ॲड. अमोल पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अत्यंत चुरशीच्या आणि उत्कंठावर्धक झालेल्या स्पर्धेत पुरुष गटात बी.पी. आर्ट्स, एस.एम.ए. सायन्स व के.के.सी. कॉमर्स महाविद्यालय, चाळीसगाव यांच्या संयुक्त संघाने दमदार खेळ करत विजेतेपद पटकावले. एस.एस. बी.टी. अभियांत्रिकी महाविद्यालय, बांभोरी संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.



महिला गटात प्रताप महाविद्यालय, अमळनेरच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. तर एस.एस. बी.टी. अभियांत्रिकी महाविद्यालय, बांभोरीचा संघ उपविजेता ठरला. या स्पर्धेत सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (भडगाव), बी.पी. आर्ट्स, एस.एम.ए. सायन्स व के.के.सी. कॉमर्स महाविद्यालय (चाळीसगाव), प्रताप महाविद्यालय (अमळनेर), दादासो डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय (चोपडा), एस.एस. बी.टी. अभियांत्रिकी महाविद्यालय (बांभोरी) तसेच कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (धरणगाव) यांच्या संघांनी सहभाग नोंदवला. यावेळी डॉ. देवदत्त पाटील (कला महाविद्यालय, मारवड), डॉ. शैलेश पाटील (धनदाई महाविद्यालय, अमळनेर), डॉ. क्रांती क्षीरसागर (दादासो डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा), डॉ. सचिन पाटील (प्रताप महाविद्यालय, अमळनेर), डॉ. दीपक पाटील (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव), प्रा. खुशाल देशमुख (चाळीसगाव महाविद्यालय) आणि प्रा. शिरसाट (एस.एस.बी.टी. अभियांत्रिकी महाविद्यालय, बांभोरी) आदी उपस्थित होते. स्पर्धेचे संयोजन महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दिनेश तांदळे यांनी केले. महाविद्यालयाचे माजी खो-खो खेळाडू रवींद्र महाजन व प्रशांत सोळंके यांनी पंच म्हणून जबाबदारी सांभाळली. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल महाविद्यालयाच्या सहभागी संघ, खेळाडू, पंच व आयोजकांचे अभिनंदन करण्यात आले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

पदाला कामाची जोड द्या; दुष्काळात जनतेच्या दारात सर्वप्रथम शिवसैनिक उभा राहिला पाहिजे: पालकमंत्री गुलाबराव पाटील

सक्तीच्या कर्जवसुलीविरोधात शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

पिंपी/धरणगाव/। प्रतिनिधी: सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत शेतकरी, शेतमजूर, गरीब कुटुंबे आणि सर्वसामान्य नागरिक अडचणींचा सामना करीत आहेत. अशा संकटाच्या काळात राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देत प्रत्येक शिवसैनिकाने गावागावात आणि घराघरात पोहोचून नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी झाले पाहिजे. "दुष्काळात मदतीची गरज असलेल्या माणसाच्या दारात सर्वप्रथम शिवसैनिक उभा दिसला पाहिजे. '८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण' ही भूमिका केवळ भाषणात नको, ती कृतीत दिसली पाहिजे," असे आवाहन पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. पिंपी येथे आयोजित धरणगाव तालुका व शहर शिवसेना-युवासेना आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी दुष्काळाचे गांभीर्य, शेतकऱ्यांचे प्रश्न, पक्षसंघटना आणि कार्यकर्त्यांची जबाबदारी यावर सविस्तर संवाद साधला. त्याचबरोबर पदाधिकाऱ्यांना कामाचा आरसा दाखवत "पदाला कामाची जोड असली पाहिजे. जे काम करत नाहीत त्यांनी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी द्यावी," अशा शब्दांत त्यांनी कानपिचक्या दिल्या. दुष्काळात गरीब माणसाचा चटका समजून घ्या दुष्काळाचा पहिला फटका शेतकऱ्याला बसतो; मात्र त्यानंतर शेतमजूर, रोजंदारी करणारा कामगार, छोटा दुकानदार, गरीब विद्यार्थी आणि



सर्वसामान्य कुटुंबांवरही त्याचा परिणाम होतो. त्यामुळे समाजातील शेवटच्या घटकाच्या अडचणी समजून घेऊन त्याच्या मदतीला धावून जाणे ही कार्यकर्त्यांची जबाबदारी असल्याचे पाटील यांनी सांगितले. शेतकऱ्यांकडून बँका किंवा वित्तीय संस्थांकडून सक्तीची अथवा अन्यायकारक कर्जवसुली केली जात असल्यास कार्यकर्त्यांनी शेतकऱ्याला एकटे पडू देऊ नये. त्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहून त्याला आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. गावातील पाणी, चारा आणि नागरिकांच्या दैनंदिन अडचणींकडेही कार्यकर्त्यांनी बारकाईने लक्ष द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले. "जोश हवा; पण होशही तितकाच हवा" पक्षसंघटनेचा आढावा घेताना पाटील यांनी कार्यकर्त्यांना स्पष्ट शब्दांत सांगितले की, "कार्यकर्ता हा चळवळ निर्माण करणारा असला पाहिजे. त्याच्यात जोश हवा आणि होशही हवा. केवळ पद घेऊन घरी बसणाऱ्यांमुळे संघटना मोठी होत नाही. लोकांच्या सुख-दुःखात धावून जाणारा कार्यकर्ता हीच शिवसेनेची खरी ताकद आहे." प्रत्यक्ष जनतेत काम करणाऱ्या आणि संघटनेसाठी वेळ देणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्यांना संधी मिळाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. "माझे माझ्या कार्यकर्त्यांवर मनापासून प्रेम आहे. कार्यकर्ता संकटात असेल तर मी त्याच्या पाठीशी अहोरात्र उभा आहे; मात्र कार्यकर्त्यानेही जनतेशी नाळ कायम ठेवली पाहिजे," असे ते म्हणाले. शेकडो समर्थकांचा शिवसेनेत प्रवेश आढावा बैठकीदरम्यान चावलखेडा, खामखेडा, कंडारी, धानोरा, गंगापुरी आणि परिसरातील माजी सरपंच, सामाजिक कार्यकर्ते तसेच त्यांच्या समर्थकांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. पाटील यांनी त्यांना पक्षाची ध्येयधोरणे डोळ्यासमोर ठेवून जनतेच्या सेवेसाठी कार्यरत राहण्याचे आवाहन केले. "आजपासून तुम्ही शिवसेना परिवाराचा भाग आहात. जनतेच्या प्रश्नांसाठी सदैव तत्पर राहा," असे पाटील यांनी नव्या कार्यकर्त्यांना सांगितले. बैठकीला पदाधिकारी, लोकप्रतिनिधींची मोठी उपस्थिती बैठकीस युवा नेतृत्व तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील, उपजिल्हाप्रमुख ॲड. शरद माळी, तालुकाप्रमुख डी. ओ. पाटील, विधानसभा क्षेत्रप्रमुख संजय पाटील, युवासेनेचे रोहित कोगटा, माजी सभापती प्रेमराज पाटील, अनिल पाटील, तालुका संघटक रवींद्र चव्हाण, शहरप्रमुख धीरेंद्र पूर्भे, न. प. गटनेते विलास महाजन, पप्पू भावे, उपनगराध्यक्षा रुपाली महाजन, नगरसेविका कविता पाटील, महिला शहरप्रमुख भारती चौधरी, उपतालुकाप्रमुख मोतीलाल पाटील, गजानन पाटील, मंगलअण्णा पाटील यांच्यासह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी तसेच आजी-माजी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गरीब माणसाचा चटका समजून घ्या

पिंपी येथे आयोजित धरणगाव तालुका व शहर शिवसेना-युवासेना आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी दुष्काळाचे गांभीर्य, शेतकऱ्यांचे प्रश्न, पक्षसंघटना आणि कार्यकर्त्यांची जबाबदारी यावर सविस्तर संवाद साधला. त्याचबरोबर पदाधिकाऱ्यांना कामाचा आरसा दाखवत "पदाला कामाची जोड असली पाहिजे. दुष्काळात गरीब माणसाचा चटका समजून घ्या दुष्काळाचा पहिला फटका शेतकऱ्याला बसतो; मात्र त्यानंतर शेतमजूर, रोजंदारी करणारा कामगार, छोटा दुकानदार, गरीब विद्यार्थी आणि सर्वसामान्य कुटुंबांवरही त्याचा परिणाम होतो.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

भडगाव तालुक्यातील २५ क्षय रुग्णांना पोषण आहार किटचे वाटप



जन सम्राट टाईम्स

भडगाव । प्रतिनिधी : प्रधानमंत्री टी.बी. मुक्त भारत अभियानांतर्गत भडगाव तालुक्यातील क्षयरोग रुग्णांसाठी निक्षय पोषण आहार व औषध वाटप कार्यक्रम तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, भडगाव येथे उत्साहात पार पडला. आयुध निर्माणी वरणगाव यांच्या CSR निधीतून तालुक्यातील क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. समाधान वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात भडगाव तालुक्यातील २५ क्षयरुग्णांना पोषण आहार किट वितरित करण्यात आले. या किटमध्ये गहू, डाळ, खाद्यतेल, दूध पावडर आदी जीवनावश्यक व पोषणमूल्य असलेल्या वस्तूंचा समावेश आहे. आयुध निर्माणी वणगावकडून गेल्या तीन वर्षांपासून जळगाव जिल्ह्यातील क्षयरोग रुग्णांना CSR निधीतून नियमितपणे पोषण आहाराची मदत केली जात आहे. यावर्षीही ही सामाजिक बांधिलकी कायम ठेवत जिल्ह्यातील क्षयरुग्णांसाठी एकूण ६४१ फूड बास्केट किट तसेच औषधांची मदत करण्यात आली. क्षयरोगाविरुद्धच्या लढ्यात केवळ औषधोपचाराबरोबरच रुग्णांना पौष्टिक आहार मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे CSR निधीतून करण्यात येणारी ही मदत रुग्णांच्या उपचार प्रक्रियेला आणि आरोग्य सुधारण्याला निश्चितच हातभार लावणारी ठरत आहे. हा कार्यक्रम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर, मोनाली कदम (WHO Consultant), डॉ. विशाल पाटील आणि डॉ. शांताराम ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी आरोग्य सहाय्यक जयराम महाजन, मिलिंद धुळे, सुरेखा धनगर आदी उपस्थित होते. या उपक्रमातून क्षयरोग रुग्णांना उपचारांसोबत पोषणाचा आधार देण्याचे महत्त्व अधोरेखित झाले.प्रधानमंत्री टी.बी. मुक्त भारत अभियानांतर्गत भडगाव तालुक्यातील क्षयरोग रुग्णांसाठी निक्षय पोषण आहार व औषध वाटप कार्यक्रम तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, भडगाव येथे उत्साहात पार पडला. आयुध निर्माणी वरणगाव यांच्या CSR निधीतून तालुक्यातील क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले. अधिकारी डॉ. समाधान वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात भडगाव तालुक्यातील २५ क्षयरुग्णांना पोषण आहार किट वितरित करण्यात आले.

पहाण गावातील पाणीपुरवठ्याच्या टाकीची दुरवस्था; झाकण नसल्याने दूषित पाण्याचा धोका

ग्रामपंचायतीने तातडीने उपाययोजना कराव्यात

जन सम्राट टाईम्स

पहाण। प्रतिनिधी : गावातील नागरिकांना ज्या पाणीपुरवठा टाकीतून पाणीपुरवठा केला जातो, त्या टाकीची गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत दुरवस्था झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला आहे. टाकीवर झाकण नसल्याने धूळ, घाण तसेच पक्षी व वानरांचा वावर वाढला असून, त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या स्वच्छतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गावातील संपूर्ण पाणीपुरवठा या टाकीतून होत असल्याने या परिस्थितीकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

टाकीच्या परिसरात वानरांचा मोठ्या प्रमाणात वावर असून, त्यांच्या विष्ठेमुळे पाण्याचे प्रदूषण होण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. त्याचप्रमाणे टाकीवर पक्ष्यांचाही वावर असल्याने पाण्याच्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. ग्रामपंचायतीच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह पाणीपुरवठ्याच्या टाकीला अनेक वर्षांपासून झाकण नसतानाही ग्रामपंचायतीकडून याकडे गांभीर्याने



लक्ष दिले जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पिण्याचे पाणी दूषित झाल्यास नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असल्याने संभाव्य आजारांचा धोका टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक तसेच संबंधित प्रशासकीय यंत्रणेने या समस्येची तातडीने दखल घेऊन पाण्याची टाकी स्वच्छ करावी, टाकीवर सुरक्षित झाकण बसवावे आणि नियमित देखभाल व पाणी तपासणीचे नियोजन करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दोन दिवसांत झाकण न बसवल्यास आंदोलनाचा इशारा राष्ट्रीय भीमसेनेचे जिल्हाध्यक्ष वाल्मीक जाधव यांनीही या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेतली आहे. गावकऱ्यांच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाने दुर्लक्ष करू नये. दोन दिवसांत पाणीपुरवठ्याच्या टाकीवर झाकण बसविण्यात आले नाही, तर प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

गावकऱ्यांच्या जीविताशी खेळ न करता ग्रामपंचायत आणि प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी ग्रामस्थ व राष्ट्रीय भीमसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

राणी दुर्गावती जयंतीनिमित्त धुळ्यात आदिवासी महिलांचा बचत गट मेळावा

जन सम्राट टाईम्स



धुळे। (प्रतिनिधी): सेवा संकल्प अभियानांतर्गत वीरांगना राणी दुर्गावती यांच्या जयंतीनिमित्त धुळे येथे आदिवासी महिलांच्या बचत गटाचा मेळावा, विविध शासकीय योजनांच्या लाभांचे वाटप तसेच गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा विशेष गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. राज्य राखीव पोलीस दलाच्या मैदानावर आयोजित या उपक्रमाला आदिवासी महिला, विद्यार्थी, अधिकारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महिला सशक्तीकरणाला चालना देण्यासाठी आयोजित बचत गट मेळाव्यात १०० आदिवासी महिला बचत गटांना प्रत्येकी १० हजार रुपये याप्रमाणे एकूण १० लाख रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. या निधीमुळे महिला बचत गटांच्या आर्थिक उपक्रमांना बळ मिळणार आहे. ३० लाभार्थ्यांना ३५ लाखांचे योजनालाभ न्यूक्लियस बजेट अंतर्गत विविध योजनांमधून पात्र ठरलेल्या ३० लाभार्थ्यांना सुमारे ३५ लाख रुपयांच्या विविध योजनांच्या लाभांचे वाटप करण्यात आले. याशिवाय शासनाच्या विविध योजना, त्यांची पात्रता व उपलब्ध लाभ याबाबत लाभार्थ्यांना माहिती मिळावी यासाठी कार्यक्रमस्थळी माहितीपर स्टॉल उभारण्यात आले होते. ७४ गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा गौरव शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधून दहावी आणि बारावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा राघोजी भांगरे गुणगौरव प्रोत्साहनपर बक्षीस योजनेअंतर्गत विशेष गुणगौरव करण्यात आला. दहावी व बारावीमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्या ७४ विद्यार्थ्यांना एकूण १२ लाख ७८ हजार रुपयांचे पारितोषिक आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

सूक्ष्म नियोजनातून उपक्रमाला यश

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील यांच्या सूक्ष्म नियोजनातून सेवा संकल्प अभियानांतर्गत हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजनांचा प्रभावीपणे लाभ देण्यात आल्याचे यावेळी दिसून आले. पात्र लाभार्थी महिला व विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे सेवा संकल्प अभियानातील विविध उपक्रमांना चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले

---

१३ वर्षांपासून बौद्ध विहारासाठी जागेची प्रतीक्षा; ग्रामपंचायतीचा हलगर्जीपणा उघड

जन सम्राट टाईम्स

सोयगाव प्रतिनिधी: शिवराम जाधव : मौजे उपळखेडा (ता. सोयगाव) येथील बौद्ध समाज गेल्या १३ वर्षांपासून केवळ ३० बाय ३५ फूट जागेसाठी प्रशासनाच्या दारात हेलपाटे मारत असल्याचा आरोप समोर आला आहे. बौद्ध विहारासाठी जागा मिळावी, यासाठी सन २०११ मध्ये ग्रामपंचायतीकडे लेखी अर्ज देण्यात आला होता. मात्र, त्या अर्जावर आजपर्यंत ग्रामपंचायतीने कोणताही ठराव घेतला नसल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. उपळखेडा येथील बौद्ध बांधव प्रविण जिवराम सोनवणे यांच्यासह समस्त बौद्ध बांधवांनी ३० नोव्हेंबर २०११ रोजी ग्रामपंचायत उपळखेडा यांच्याकडे लेखी अर्ज सादर केला होता. गावातील गायरान अथवा सार्वजनिक जागेपैकी ३० बाय ३५ फूट जागा बौद्ध विहाराच्या बांधकामासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी या अर्जाद्वारे करण्यात आली होती. संबंधित अर्जावर तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांची पोहोच असल्याचेही सांगण्यात आले आहे. २०११च्या अर्जावर अद्याप कारवाई नाही? अर्ज सादर करून तब्बल १३ वर्षे उलटूनही ग्रामपंचायतीकडून या मागणीवर साधा ठरावदेखील करण्यात आला नसल्याचा आरोप बौद्ध समाजाने केला आहे. विहारासाठी जागा उपलब्ध नसल्याने समाजातील धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी अडचणी निर्माण होत असून, काही कार्यक्रम उघड्यावर घ्यावे लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायतीच्या पातळीवर मागणीची दखल न घेतल्याने अखेर बौद्ध समाजाने ५ ऑक्टोबर २०२६ रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती सोयगाव यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली. या तक्रारीवर पंचायत समितीचा आवक क्रमांक व दिनांकाचा शिक्का असल्याचे तक्रारदारांनी सांगितले आहे. BDOकडे तीन प्रमुख मागण्या तक्रारीद्वारे बौद्ध समाजाने प्रशासनाकडे तीन प्रमुख मागण्या केल्या आहेत. १) ग्रामपंचायत उपळखेडा यांना आदेश देऊन गायरान जागेतून ३० बाय ३५ फूट जागा बौद्ध विहारासाठी राखीव करण्यात यावी. २) सन २०११ मध्ये सादर केलेल्या अर्जावर आजपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली, याची फाईल नोटिंग व ग्रामपंचायत ठरावाची प्रत उपलब्ध करून द्यावी. ३) जागा उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित जबाबदार अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्यात यावी. BDOच्या भूमिकेकडे गावाचे लक्ष बौद्ध समाजाला एका छोट्याशा जागेसाठी तब्बल १३ वर्षे प्रतीक्षा करावी लागणे हा प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा प्रकार असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. आता गटविकास अधिकारी या तक्रारीची कितपत गांभीर्याने दखल घेतात आणि ग्रामपंचायतीकडून २०११च्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीचा अहवाल मागवून पुढील निर्णय घेतात का, याकडे उपळखेडा ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. शिवराम जाधव : मौजे उपळखेडा (ता. सोयगाव) येथील बौद्ध समाज गेल्या १३ वर्षांपासून केवळ ३० बाय ३५ फूट जागेसाठी प्रशासनाच्या दारात हेलपाटे मारत असल्याचा आरोप समोर आला आहे.

रावेर पोलिसांची अवैध हातभट्टी दारूभट्ट्यांवर धडक

नेहता परिसरात कारवाई; हातभट्टी दारू व कच्चे-पक्के रसायन नष्ट, अवैध दारू निर्मात्यांना इशारा

जन सम्राट टाईम्स

रावेर। प्रतिनिधी: तालुक्यात अवैध हातभट्टी दारूची निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरोधात रावेर पोलिसांनी धडक मोहीम राबवली. पाल, अंजदा व नेहता परिसरात करण्यात आलेल्या कारवाईत गावठी हातभट्टी दारू, गुळ-मोह मिश्रित कच्चे व पक्के रसायन असा एकत्रित ८१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. या कारवाईमुळे अवैध दारू निर्मिती करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. पाल बिटमध्ये कारवाई रावेर पोलीस ठाण्याच्या पाल बिट परिसरात ३० लिटर गुळ-मोह मिश्रित उकळते रसायन व ४० लिटर गुळ-मोह मिश्रित कच्चे रसायन, असा अंदाजे २३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल आढळून आला. पोलिसांनी हा मुद्देमाल नष्ट केला. याच परिसरात कृष्णा मधुकर राठोड (वय २७, रा. पाल, ता. रावेर) याच्याकडून १५ लिटर गावठी हातभट्टी दारू, अंदाजे १ हजार ५०० रुपये किमतीची, आढळून आली. सदर दारूही पोलिसांनी नष्ट केली. अंजदा बिटमध्येही धडक अंजदा बिट परिसरात सुपडू भिवसन तायडे (रा. नेहता, ता. रावेर) याच्याकडून ३० लिटर गावठी हातभट्टी दारू, १०० लिटर गुळ-मोह मिश्रित कच्चे रसायन आणि १५० लिटर पक्के रसायन, असा अंदाजे २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल आढळून आला. पोलिसांनी हातभट्टी दारू



निर्मितीसाठी वापरले जाणारे रसायन तसेच तयार दारू व साहित्य जागेवरच नष्ट केले. रावेर परिसरात अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. हातभट्टी दारूमुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम तसेच सामाजिक वातावरणावर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता पोलिसांनी ही मोहीम अधिक तीव्र केली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. रावेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप पाटील व सहाय्यक पोलीस निरीक्षक हरिदास बोचरे यांच्या आदेशानुसार एपीआय अमूल बच्छाव, पीएसआय मनोज महाजन, गुन्हे शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल संभाजी बिजागरे, विशाल पाटील, प्रमोद पाटील, श्रीकांत चव्हाण, सुकेश तडवी, विकार शेख तसेच डीबी पथकाने ही कारवाई केली. अवैध हातभट्टी दारू तयार करणारे व विक्री करणाऱ्यांनी तातडीने हा व्यवसाय बंद करावा, अन्यथा पुढील काळातही अशाच प्रकारची कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून पोलिसांनी दिला आहे. तालुक्यात अवैध हातभट्टी दारूची निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरोधात रावेर पोलिसांनी धडक मोहीम राबवली. पाल, अंजदा व नेहता परिसरात करण्यात आलेल्या कारवाईत गावठी हातभट्टी दारू, गुळ-मोह मिश्रित कच्चे व पक्के रसायन असा एकत्रित ८१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. या कारवाईमुळे अवैध दारू निर्मिती करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. पाल बिटमध्ये कारवाई रावेर पोलीस ठाण्याच्या पाल बिट परिसरात ३० लिटर गुळ-मोह मिश्रित उकळते रसायन व ४० लिटर गुळ-मोह मिश्रित कच्चे रसायन, असा अंदाजे २३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल आढळून आला. पोलिसांनी हा मुद्देमाल नष्ट केला.

कुस्ती स्पर्धेत संजना मोरेचे दैदिप्यमान यश

जन सम्राट टाईम्स

पारोळा । प्रतिनिधी: येवला, जि. नाशिक येथे नुकत्याच पार पडलेल्या नाशिक विभागीय कुस्ती स्पर्धेत सहजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, टेहू संचलित श्री दत्त माध्यमिक विद्यालय, चोरवड येथील विद्यार्थिनी कु. संजना विजय मोरे हिने १४ वर्षाखालील ४६ किलो वजन गटात दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर संजनाची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संजना हिने विभागीय स्तरावर आपल्या उत्कृष्ट कुस्ती कौशल्याचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. तिच्या या यशामुळे चोरवड गावासह पारोळा तालुक्याच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने कुस्तीच्या मैदानात मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. संजना मोरे हिला प्रमोद पाटील (भोंडण) तसेच विद्यालयाचे क्रीडाशिक्षक श्री. उमेश पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे संजनाला सातत्यपूर्ण सराव आणि योग्य प्रशिक्षण मिळाले. संजना हिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. खासदार काकासाहेब वसंतरावजी मोरे, सचिव पराग दादा मोरे, पारोळा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष ॲड. रोहन दादा मोरे, गटशिक्षणाधिकारी चौधरी मॅडम, माजी गटशिक्षणाधिकारी नानासो विश्वासराव पाटील, मुख्याध्यापक श्री. विनोद पाटील, पारोळा तालुका क्रीडा समन्वयक श्री. संदीप पवार, विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

ओमप्रकाश अग्रवाल म्हणजे विविध क्षेत्रांतील यशस्वी 'भीष्म पितामह'

अमृतमहोत्सवानिमित्त ११ शेतकऱ्यांना दुभत्या गायींचे गोदान, दुष्काळ निधीसाठी ११ लाखांचा धनादेश देण्याची घोषणा

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: भाजपचे ज्येष्ठ नेते तथा ज्येष्ठ उद्योजक ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त अग्रवाल कुटुंबाने दुष्काळी परिस्थितीचे समाजभान राखत शेतकऱ्यांप्रती संवेदनशीलता जपली. अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने ११ शेतकऱ्यांना वासरांसह दुभत्या गायींचे गोदान करण्यात आले, तर शासनाच्या दुष्काळ निधीसाठी ११ लाख रुपयांचा धनादेश देण्याची घोषणाही करण्यात आली. ओमप्रकाश अग्रवाल हे धुळे शहराच्या सामाजिक, राजकीय, सहकार, आध्यात्मिक आणि उद्योग क्षेत्रातील 'भीष्म पितामह' आहेत. संघर्षातून उभा राहिलेला त्यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी असून, राष्ट्रवादाची प्रेरणा घेत जनसंघ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून सुरू झालेली त्यांची वाटचाल भारतीय जनता युवा मोर्चा आणि भारतीय जनता पक्षातील विविध जबाबदाऱ्यांपर्यंत पोहोचली. समाजातील शेवटच्या घटकाच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले, असे गौरवोद्गार राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काढले. ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त रविवारी (दि. ४) खान्देश गोशाळेच्या मैदानावर ओपी शेट यांचा सन्मान, भजनसंध्या, भक्तिमय गीतगायन आणि शेतकऱ्यांना गोदान असा विविधांगी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बावनकुळे बोलत होते. यावेळी केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, सत्कारमूर्ती ओमप्रकाश अग्रवाल, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, खासदार स्मिता वाघ, खासदार डॉ. शोभा बच्छाव यांच्यासह विविध आमदार, लोकप्रतिनिधी, भाजप पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. सरकार अनुपभैयांच्या पाठीशी : बावनकुळे



महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, धुळे शहरवासीयांनी अनुपभैया अग्रवाल यांच्या रूपाने विधानसभेत एक 'हिरा' कार्यकर्ता पाठविला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या आमदारांमध्ये अनुपभैयांचा समावेश आहे. धुळे शहरातील प्रश्न आणि समस्या सोडविण्यासाठी ते सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. अनुपभैयांनी विधानसभा निवडणुकीत धुळेकरांना दिलेली प्रत्येक आश्वासने पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार त्यांच्या पाठीशी राहील, अशी ग्वाही देत शहर विकासासाठी त्यांनी मागितलेले प्रत्येक काम पूर्ण करण्यासाठी सरकार सहकार्य करेल, असे बावनकुळे यांनी जाहीर केले.

पालकमंत्री जयकुमार रावल म्हणाले की, 'आई-वडिलांमध्येच देव असतो' या भावनेतून आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी आपल्या वडिलांचा अमृतमहोत्सव सोहळा भव्य स्वरूपात आयोजित केला आहे. ओपी शेट यांनी अत्यंत कष्ट आणि संघर्षातून जीवनाची वाटचाल केली. जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक, भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आणि त्यानंतर भाजपचे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदाऱ्या सांभाळल्या. विविध आंदोलनांच्या माध्यमातून धुळे जिल्ह्यात भाजपची पाळेमुळे रुजविण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या संस्कारातून घडलेले अनुपभैया आज लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत आहेत. दुष्काळी परिस्थितीचे भान ठेवून वडिलांच्या अमृतमहोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबविणे ही अभिमानाची बाब असल्याचे रावल यांनी सांगितले. ओपीजी हे द्रष्टे व्यक्तिमत्त्व : महाजन

जलसंपदामंत्री गिरीश महाजन म्हणाले की, ओपी शेट यांचा अमृतमहोत्सवी सोहळा हा त्यांच्या ७५ वर्षांच्या संघर्षाचा, संस्कारांचा आणि समाजसेवेचा गौरव आहे. 'जिंदगी लंबी नहीं, बड़ी होनी चाहिए' याची प्रचिती ओपी शेट यांच्या जीवनप्रवासातून येते. किती वर्षे जगलो यापेक्षा समाजासाठी कसे जगलो, गोरगरीब आणि गरजूंसाठी काय योगदान दिले, धर्म आणि राष्ट्रासाठी काय कार्य केले, हे महत्त्वाचे आहे. जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपमधील ओपी शेट यांचे योगदान आजही मार्गदर्शक आहे. राजकारण, समाजकारण, उद्योग, शिक्षण, सहकार आणि अर्थकारण अशा विविध क्षेत्रांत काम करताना त्यांनी सामान्य जनतेशी नाते जोडले. अनुपभैयांच्या रूपाने त्यांच्या कुटुंबातून धुळे शहराला चांगला लोकप्रतिनिधी मिळाला असून, ३०० सदस्यांचा परिवार आजही एकसंध ठेवण्याचे श्रेय ओपी शेट यांना जाते, असे महाजन यांनी सांगितले. अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी धुळेकरांना मोठी भेट दिली आहे. गेल्या ४० वर्षांपासून प्रलंबित असलेले एमआयडीसी विस्तारीकरणाचे स्वप्न आता पूर्ण झाले आहे. रावेर एमआयडीसीसाठी २ हजार एकर जागा मंजूर करण्यात आली आहे. या निर्णयामुळे औद्योगिकीकरणाला मोठी चालना मिळणार असून, स्थानिक कुशल व अकुशल मनुष्यबळासाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील. या निर्णयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री जयकुमार रावल आणि संपूर्ण मंत्रिमंडळाचे अनुपभैयांनी आभार मानले.

एमआयडीसीसाठी २ हजार एकर जागा मंजूर

आमदार अनुपभैया अग्रवाल म्हणाले की, ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी धुळेकरांना मोठी भेट दिली आहे. गेल्या ४० वर्षांपासून प्रलंबित असलेले एमआयडीसी विस्तारीकरणाचे स्वप्न आता पूर्ण झाले आहे. रावेर एमआयडीसीसाठी २ हजार एकर जागा मंजूर करण्यात आली आहे. या निर्णयामुळे औद्योगिकीकरणाला मोठी चालना मिळणार असून, स्थानिक कुशल व अकुशल मनुष्यबळासाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील. या निर्णयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री जयकुमार रावल आणि संपूर्ण मंत्रिमंडळाचे अनुपभैयांनी आभार मानले.भाजपचे ज्येष्ठ नेते तथा ज्येष्ठ उद्योजक ओमप्रकाश अग्रवाल यांच्या कुटुंबाने दुष्काळी परिस्थितीचे समाजभान राखत शेतकऱ्यांप्रती संवेदनशीलता जपली. अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने ११ शेतकऱ्यांना वासरांसह दुभत्या गायींचे गोदान करण्यात आले, तर शासनाच्या दुष्काळ निधीसाठी ११ लाख रुपयांचा धनादेश देण्याची घोषणाही करण्यात आली. ओमप्रकाश अग्रवाल हे धुळे शहराच्या सामाजिक, राजकीय, सहकार, आध्यात्मिक आणि उद्योग क्षेत्रातील 'भीष्म पितामह' आहेत.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

हृदयरोगाचा धोका टाळण्यासाठी लक्षणे दिसताच वैद्यकीय मदत घ्या!

जन सम्राट टाईम्स



भुसावळ। प्रतिनिधी : वाढता ताणतणाव, बदलती जीवनशैली, व्यायामाचा अभाव आणि चुकीच्या आहारपद्धतीमुळे हृदयरोगासह विविध गंभीर आजारांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. त्यामुळे आजारांची लक्षणे आणि प्राथमिक उपाययोजनांबाबत प्रत्येकाने जागरूक असणे गरजेचे आहे. हृदयरोगाची लक्षणे दिसताच वेळ न दवडता तातडीने योग्य वैद्यकीय मदत घ्यावी, असा सल्ला प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. राजेश मानवतकर यांनी दिला. कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथील मराठी विभागाच्या वतीने श्रद्धेय हरिभाऊ जावळे यांच्या जयंतीनिमित्त 'चला आरोग्यावर बोलू काही' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'हृदयरोग व इतर गंभीर आजार कसे टाळता येतील?' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. मानवतकर बोलत होते.प्रमुख पाहुणे म्हणून सेकंडरी एज्युकेशन सोसायटीच्या चेअरमन हेमलताताई इंगळे, सचिव भास्कर पिंपळे तसेच संस्थेच्या कार्यकारी मंडळातील सदस्य उपस्थित होते. व्यायाम, आरोग्य तपासणी आणि संतुलित आहार महत्त्वाचा डॉ. मानवतकर यांनी हृदयरोगासह विविध शारीरिक आजारांची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि उपचारपद्धती याबाबत मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, नियमित योग्य व्यायाम, वेळोवेळी आरोग्य तपासणी आणि आरोग्यदायी आहार या तीन बाबींना जीवनात महत्त्व दिल्यास अनेक गंभीर आजारांचा धोका कमी करण्यास मदत होऊ शकते.प्रत्येकाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपल्या शारीरिक आरोग्याची काळजी घ्यावी. विविध आजारांची प्राथमिक लक्षणे प्रत्येक कुटुंबातील सदस्याला माहिती असणे आवश्यक आहे. त्यामुळे योग्य दुर्लक्ष न करण्याचे आवाहन कोणताही आजार शरीरात निर्माण झाल्यानंतर विविध लक्षणांच्या माध्यमातून त्याची सूचना देत असतो. मात्र, या लक्षणांची माहिती नसल्यामुळे अनेकदा नागरिक त्याकडे दुर्लक्ष करतात आणि परिणामी आजाराची तीव्रता वाढू शकते. हे टाळण्यासाठी प्रत्येक कुटुंबात आरोग्यविषयक जनजागृती होणे आवश्यक असल्याचे डॉ. मानवतकर यांनी सांगितले. यावेळी त्यांनी हृदयरोग, मधुमेह, कर्करोग, पक्षाघात आणि मूत्राशयाशी संबंधित आजार यांची प्राथमिक लक्षणे तसेच उपचार आणि प्रतिबंधात्मक उपायांबाबत माहिती दिली. आपत्कालीन परिस्थितीत तातडीच्या उपायांची माहिती एखाद्या व्यक्तीला अचानक हृदयविकाराचा झटका किंवा पक्षाघाताचा त्रास झाल्यास त्याच्या जवळच्या व्यक्तिंनी तातडीने कोणती पावले उचलावीत, याबाबतही डॉ. मानवतकर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. आरोग्य साक्षरता' आणि 'आरोग्य केअरटेकर फ्रेंड्स' या दोन्ही संकल्पना समाजात मोठ्या प्रमाणावर रुजणे गरजेचे असून, प्रत्येकाने आरोग्याबाबत जागरूक राहावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. जतीन मेढे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विभागातील सहकारी प्रा. डॉ. दिनेश पाटील यांनी केले. कार्यक्रमास संस्थेच्या कार्यकारी मंडळातील संचालक, प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री बालाजी संस्थानच्या कारभाराची SIT चौकशी करा

जन सम्राट टाईम्स

पारोळा, । प्रतिनिधी : पारोळा शहराची सुमारे ३७५ वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या ग्रामदैवत श्री बालाजी महाराज संस्थानच्या आर्थिक व प्रशासकीय कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. संस्थानच्या संपूर्ण कारभाराची विशेष तपास पथकाद्वारे (SIT) सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत संस्थानवर प्रशासक नियुक्त करावा, अशी जोरदार मागणी आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांनी पत्रकार परिषदेत केली. श्री बालाजी महाराज हे पारोळा शहरासह परिसरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. विशेषतः ब्रह्मोत्सवाच्या काळात संस्थानला मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम, सोने, चांदी, आभूषणे तसेच विविध स्वरूपातील देणग्या प्राप्त होत असतात. त्यामुळे या देणग्यांची नोंद, त्यांचा हिशेब, संस्थानचे आर्थिक व्यवहार आणि प्रशासकीय निर्णय यामध्ये पूर्ण पारदर्शकता असणे गरजेचे आहे, असे आमदार पाटील यांनी स्पष्ट केले. महाप्रसाद समितीच्या निधीच्या हस्तांतरणावर सवाल संस्थानची नोंदणी होण्यापूर्वी स्वतंत्र महाप्रसाद समिती कार्यरत होती. गावातील नागरिकांना आजीवन सभासद करून स्व. अण्णासाहेब रामदास तुकारामशेठ वाणी यांच्या नेतृत्वाखाली अनेक वर्षे ब्रह्मोत्सवानंतर संपूर्ण गावासाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येत होते. मात्र, स्व. अण्णासाहेब वाणी यांच्या निधनानंतर ही समिती बंद करून स्वतंत्र 'व्यंकटेश महाप्रसाद व अन्नछत्र मंडळ' स्थापन करण्यात आले. महाप्रसादासाठी जमा झालेला निधी या नवीन संस्थेकडे वर्ग करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. या निधीच्या हस्तांतरणाचा संस्थानच्या एकत्रित ऑडिटमध्ये स्पष्ट उल्लेख का नाही, असा सवाल आमदार पाटील यांनी उपस्थित केला. सोने-चांदी, रोख देणग्यांच्या नोंदींचीही चौकशीची मागणी भाविकांकडून संस्थानला प्राप्त होणाऱ्या सोने-चांदीच्या वस्तू, आभूषणे, रोख देणग्या तसेच इतर मौल्यवान वस्तूंच्या नोंदी आणि त्यांचा हिशेब याबाबतही पारदर्शकता असणे आवश्यक आहे. या सर्व व्यवहारांची स्वतंत्रपणे तपासणी होणे गरजेचे असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. संस्थानच्या आर्थिक आणि प्रशासकीय व्यवहारांची SIT मार्फत निष्पक्ष, सखोल आणि सर्वंकष चौकशी करण्यात यावी. चौकशीदरम्यान कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होऊ नये यासाठी चौकशी पूर्ण होईपर्यंत संस्थानवर प्रशासक नियुक्त करावा, अशी मागणीही त्यांनी केली. भाविकांच्या श्रद्धेचा विषय; पारदर्शक कारभाराची गरज श्री बालाजी महाराज संस्थान हे केवळ धार्मिक स्थळ नसून पारोळा शहराच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरेशी जोडलेले श्रद्धास्थान आहे. त्यामुळे संस्थानच्या कारभारात आर्थिक शुचिता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व राहणे आवश्यक आहे. भाविकांच्या श्रद्धेशी संबंधित असलेल्या संस्थानच्या व्यवहारांबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची वस्तुस्थिती निष्पक्ष चौकशीतून जनतेसमोर यावी, अशी भूमिका आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांनी व्यक्त केली.

निवारा बालगृहातील १०० विद्यार्थ्यांना वही, पेन, बिस्किटे व खाऊचे वाटप!

जन सम्राट टाईम्स



जामखेड । (प्रतिनिधी): वाढदिवस म्हटला की बॅनरबाजी, डीजे आणि फटाक्यांची आतषबाजी यावर होणारा अनावश्यक खर्च टाळत जामखेडचे युवा नेते निशांत भैय्या तुपेरे यांनी आपला वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत अत्यंत साध्या पद्धतीने साजरा केला. जामखेड नगरपरिषदेचे नगरसेवक ॲड. अरुणआबा जाधव यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या निवारा बालगृह, जामखेड येथे विद्यार्थ्यांसोबत हा वाढदिवस साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून निवारा बालगृहातील सुमारे १०० विद्यार्थ्यांना वही, पेन यांसह शैक्षणिक साहित्य, बिस्किट पुडे आणि खाऊचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. यावेळी संतोषभाऊ गव्हाळे, राणाभाऊ सदाफुले, सुमित भालेराव आणि राजू फिटर यांनी मनोगत व्यक्त करून निशांत भैय्या तुपेरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच निवारा बालगृहाच्या माध्यमातून सुरू असलेल्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक करून व्यवस्थापनाचे आभार मानले. विविध भागांतही सामाजिक उपक्रम निशांत भैय्या तुपेरे यांच्या वाढदिवसानिमित्त कर्जत, जामखेड शहर, चुंबळी फाटा, हाळगाव आणि फक्राबाद यांसह विविध भागांतही विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. वाढदिवसाचा उत्सव केवळ व्यक्तिगत आनंदापुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू घटकांसाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

बालगृहातील सामाजिक उपक्रमांची परंपरा कायम निवारा बालगृहात सामाजिक उपक्रमांची परंपरा सातत्याने जपली जात आहे. गेल्याच महिन्यात जामखेड नगरपरिषदेचे सभापती तथा नगरसेवक संतोषभाऊ सदाफुले यांचा वाढदिवसही येथे साजरा करण्यात आला होता. त्यावेळी राजू फिटर यांच्या वतीने निवारा बालगृहाला एक तांदळाचे पोते मदत म्हणून देण्यात आले होते. या उपक्रमाची आठवणही यावेळी उपस्थितांनी सांगितली. मान्यवरांची उपस्थिती या वाढदिवस सोहळ्याला सभापती तथा जामखेड नगरसेवक संतोषभाऊ गव्हाळे, जामखेडचे राणाभाऊ सदाफुले, नगरसेवक सुमित भालेराव, पत्रकार बापूसाहेब घोडेस्वार, प्रीतम घायतडक, राजू फिटर, सोमनाथ माने, अवधूत भालेराव, सनी समुद्र, ऋषी रंधवे तसेच निवारा बालगृहाचे शिंदे सर, सागर राजे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते.

धरणगावात दशलक्षण पर्वाची भक्तीमय सांगता; २४ तीर्थंकर महापूजा व जलयात्रा महोत्सव!

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: येथील दिगंबर जैन समाजाच्या वतीने दशलक्षण पर्वाच्या सांगतेनिमित्त आयोजित करण्यात आलेला दोन दिवसीय धार्मिक सोहळा दि. २ व ३ ऑक्टोबर रोजी उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात थाटात पार पडला. या सोहळ्यात २४ तीर्थंकरांची महापूजा, जलयात्रा महोत्सव, रथोत्सव, महाप्रसाद, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. दहा दिवस चाललेल्या दशलक्षण पर्वात मंदिरात नित्य अभिषेक, पूजन, पाठशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध व्रत-उपवास आणि धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रम तसेच पाठशाळेचे सुंदर आयोजन सौ. सुलभा लाड यांनी केले. २४ तीर्थंकरांची भव्य महापूजा दि. २ ऑक्टोबर रोजी २४ तीर्थंकरांची भव्य महापूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. धर्मानुरागी श्रीमती कल्पना अनिल डहाळे, स्वप्नील डहाळे व डॉ. श्वेता डहाळे, पुणे परिवाराच्या वतीने या महापूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात



आले होते.

यावेळी मोठ्या संख्येने भाविकांनी धार्मिक विधींमध्ये सहभागी होत तीर्थंकरांचे दर्शन घेतले. ढोल-ताशांच्या गजरात जलयात्रा व रथोत्सव दि. ३ ऑक्टोबर रोजी भव्य जलयात्रा महोत्सव आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. जलयात्रा व रथोत्सव मिरवणुकीत ढोल-ताशांच्या गजराने वातावरण भक्तिमय झाले. युवकांनी लेझीम पथकासह नृत्य सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. तर भगवान महावीर चौकात महिलांनी उत्स्फूर्तपणे गरबा नृत्य सादर केले. रथोत्सवात मालमनोहरची बोली घेणारे चि. अयांश प्रितेश जैन यांची घोड्यावरून मिरवणूक काढण्यात आली. या दिवशीचा महाप्रसाद धर्मानुरागी अजय महाजन, प्रणिता महाजन, शलाका, श्रद्धा व पुष्कर महाजन, जळगाव यांच्या वतीने देण्यात आला. विविध शहरांतील भाविकांची उपस्थिती या धार्मिक सोहळ्यासाठी बेंगळुरू, मुंबई, पुणे, नागपूर, वर्धा, भडगाव, पारोळा, जळगाव, धुळे, बेटावद आणि एरंडोल येथून असंख्य भाविक धरणगावात दाखल झाले होते. भक्तिमय वातावरणात भाविकांनी धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेतला. यावेळी सांस्कृतिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करण्यात आले. यात्री निवासासाठी देणगीदारांचा सत्कार यात्री निवासासाठी धर्मानुरागी पियूष जैन, श्रद्धा जैन आणि श्रीमती रंजना महाजन यांनी दोन खोल्यांसाठी देणगी जाहीर केली. त्यांच्या या योगदानाबद्दल श्री. दीपकजी लाड, लिझा जैन आणि सौ. प्राजक्ता लाड यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

ज्ञानाची उपासना अन् आत्मशुद्धीचा संगम

गुणवंत विद्यार्थी व पर्युषण उपासकांचा गौरव श्री दिगंबर जैन बहुउद्देशीय मंडळाचा प्रेरणादायी उपक्रम

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: अथक प्रयत्न करणारे गुणवंत विद्यार्थी आणि आत्मशुद्धीसाठी कठीण तपश्चर्या करणारे पर्युषण पर्वाचे उपासक यांचा एकाच व्यासपीठावर गौरव करण्याचा प्रेरणादायी सोहळा जळगावात उत्साहात संपन्न झाला. श्री दिगंबर जैन बहुउद्देशीय मंडळ, जळगाव यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार आणि पर्युषण पर्व उपासकांचा गौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता. ज्ञान आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थित समाजबांधवांनी विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यासोबतच पर्युषण पर्वात संयम, उपवास आणि तपश्चर्येच्या माध्यमातून आत्मशुद्धीचा मार्ग स्वीकारणाऱ्या उपासकांचा सन्मान करण्यात आला. समाजाला मंदिराच्या चौकटीबाहेर एकत्र आणण्याचा प्रयत्न आजच्या बदलत्या काळात समाज केवळ धार्मिक स्थळांच्या चौकटीपुरता मर्यादित न राहता विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून एकत्र येणे आवश्यक आहे. ही गरज ओळखून श्री दिगंबर जैन बहुउद्देशीय मंडळाकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत.

मंडळाचे डेरेकर साहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांची दूरदृष्टी,



सातत्य, सेवाभाव आणि समाजाला एकत्र आणण्याची धडपड या उपक्रमातून दिसून येत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. मंडळाच्या संपूर्ण टीमच्या सामाजिक कार्याचे उपस्थितांनी कौतुक केले. 'आपल्याला समाज पुढे न्यायचा आहे' कार्यक्रमादरम्यान मंडळाचे डेरेकर साहेब यांनी व्यक्त केलेले विचार समाजबांधवांसाठी प्रेरणादायी ठरले. "कुटे साहेब, आपल्याला समाज पुढे न्यायचा आहे," या त्यांच्या आवाहनातून समाजाच्या प्रगतीसाठी एकजुटीने काम करण्याचा संदेश देण्यात आला. समाजातील तरुण पिढीला शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीशी जोडण्याबरोबरच विविध घटकांना एका व्यासपीठावर आणण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. मंडळाच्या कार्यात सक्रिय सहभागाची घोषणा या प्रेरणादायी उपक्रमाने प्रभावित होऊन समाजबांधव मंगेश कुटे यांनी श्री दिगंबर जैन बहुउद्देशीय मंडळाचा सक्रिय सदस्य म्हणून कार्य करण्याची इच्छा व्यक्त केली. समाजाच्या विकासासाठी मंडळाच्या विविध उपक्रमांमध्ये पूर्ण निष्ठेने सहभागी होऊन योगदान देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. 'चला, समाज घडवूया, समाज जोडूया!' गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि पर्युषण उपासकांचा सन्मान या माध्यमातून ज्ञान, संस्कार, संयम आणि सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला. 'चला, समाज घडवूया, समाज जोडूया!' या उदात्त ध्येयाने प्रेरित झालेला हा उपक्रम जळगावच्या जैन समाजात चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरला आहे.

MPSC अध्यक्ष विवेक भिमनवार यांची गच्छंती अटळ

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: : एम पीएससी उमेदवारांचे आंदोलन लक्षात घेता आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला आहे. त्यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना पत्र लिहून संविधानाच्या कलम ३१७ नुसार एमपीएससी आयोगाचे माजी व सध्याचे अध्यक्ष आणि सदस्यांवर कारवाई करण्यासाठी एका चौकशी समितीचे गठन करण्याची विनंती केली आहे.

मुख्यमंत्र्यांनी हायकोर्टाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्याची शिफारस केली असून, पुढील कारवाईसाठी तीन महिन्यांच्या आत अहवाल सादर करण्यास सांगितले. तज्ज्ञांच्या मते, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या शिफारशीनंतर आता एमपीएससीचे विद्यमान अध्यक्ष विवेक भिमनवार यांचे पद जाणे निश्चित मानले जात आहे. एमपीएससीच्या परीक्षामधील कथित गैरव्यवहार आणि पेपरफुटीच्या प्रकरणांवरून पुण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे.

विशेषतः अलीकडेच अन्न व औषध प्रशासन विभागांतर्गत असलेल्या 'ड्रग इन्स्पेक्टर' पदाचा पेपर फुटल्याने विद्यार्थ्यांमध्ये मोठा संताप पाहायला मिळत आहे. दरम्यान, आंदोलनामुळे महायुती सरकारवरील दबाव वाढला आहे. नुकतीच मुख्यमंत्री फडणवीस व स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधीमंडळात बैठक पार पडली. त्या बैठकीत एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या बदलीसंदर्भात आश्वासन देण्यात आले.